# बोदवड महाविद्यालयात कला शाखेचा उमंग कार्यक्रम साजरा

(08.08.2019) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे दि 8 ऑगष्ट 2019 रोजी कला विभागातील विद्यार्थ्यांनी **उमंग दिन** साजरा केला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद चौधरी होते. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना त्यांनी विद्यार्थ्यानी एकत्रित राहून, विविध कार्यक्रमात सहभागी होऊन स्वतः कार्यक्रमाची धुरा सांभाळावी व कार्यक्रम यशस्वी करावे असे आव्हान केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डी एस पाटील, डॉ मधुकर खराटे होते या उपक्रमात द्वितीय व तृतीय कला वर्गातील विद्यार्थ्यांनी सुरेख सजावट व संगीतमय वातावरणात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले या प्रसंगी कु आरती भोई, कु रोशनी बहादूर या विद्यार्थ्यानी आपले मनोगत व्यक्त केले मांडवकर कुमारी रूपाली माळी योगेश लासूरकर यांनी मनोगत व्यक्त केले डॉ मनोज निकाळजे यांनी यांनी उमंग कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या वर्षभरातील कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली विद्यार्थ्यानी रेकॉर्ड गिफ्ट, गितगायन तसेच फिश पॉइंट कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी खुशबू जैन हिने केले आभार प्रदर्शन पूजा पाटील हिने मानले कार्यक्रमाची यशस्विता होण्यासाठी कुमारी जावरे, कुमारी वर्मा, बुगडी, मन्यार व वाणी तसेच तृतीय वर्षाचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रम प्रसंगी प्रा अजय पाटील, डॉ कामिनी तिवारी, डॉ म्हसलेकर, दांडगे मॅडम अग्रवाल मॅडम उपस्थित होत्या.









